CREATE HOPE in the WORLD | Rotary | THE MAGIC OF ROTARY

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MDITOWN

Rotary International District 3132 | Club No. 22604

## JULY-2024



**Stephanie A. Urchick**
Rotary International President



**Rtn Suresh Saboo**
District Governor



**Rtn Chetan Pandharikar**
President



**Rtn Girish Pensalwar**
Secretary

# TABLE OF CONTENTS


- Editorial - Rtn Prasad Warad 3
- RI President. Stephanie A. Urchick's Message 4
- DG Suresh Saboo's Message 6
- AG Nanik Jodhwani's Message 7
- President Rtn Chetan Pandharikar's Message 8
- Secretary Rtn Girish Pensalwar's Message 10
- Board Of Directors 2024-25 11
- IPP Ravindra Bankar's Message 12
- Rtn Avinash Bhosale Secretary 23-24 Report 15
- Rtn Kishor Datal Secretary 23-24 Message 19
- Maternal Health and Child Care - PP Rtn Rajgopal Tapdiya 21
- Installation Ceremony 23
- July Projects 24
- july Meetings 25
- August Month Birthdays 26

# Editorial



Rtn Prasad Warad

Dear Rotarians and Friends,

As we begin this new Rotary year, I am both delighted and honored to take on the role of Monthly Bulletin Editor for you. Rotary Club of Latur Midtown has a rich tradition of service and friendship, and I am excited to share our stories, successes, and future plans through this publication.

In each edition, we will reflect on our outstanding achievements, celebrate the dedication of our members, and focus on the opportunities and challenges ahead. Let us renew our commitment to the principle of "Service Above Self" and strive to make a lasting impact on our community and beyond.

We welcome your ideas, articles, and feedback to ensure that this bulletin truly reflects the spirit and dedication of our collective club. Together, we will inspire, inform, and connect, strengthening the bonds within our Rotary family.

In Rotary Service,
Rtn. Prasad Warad
Editor

# ROTARY INTERNATIONAL PRESIDENT



RI President. Stephanie A. Urchick

Rotary is at its best when we foster a sense of inclusion and belonging in our clubs. In fact, I would go so far as to say that belonging is The Magic of Rotary itself.

With a focus on inclusivity and belonging, it is easier to be united in a common purpose. When we are committed to one another and focused on our goals, we are most effective.
Rotary's Action Plan can help. The Action Plan comes with tools you can use to collect feedback, assess your club's strengths and weaknesses, and address challenges.

The world is changing, and our clubs can't afford to stand still. But the changes we make need to be consistent and strategic — building on one another toward a greater vision. The Action Plan can help you work toward that vision and create effective change within your club. Following the Action Plan and addressing suggestions from the community will go a long way to fostering the sense of belonging we want all Rotary members to feel in their clubs.

That's why expanding our commitment to diversity, equity, and inclusion is so important. Committing ourselves to each other's well-being is the first step to expanding our reach, allowing us to spread Positive Peace in these troubled times.

Peacebuilding is one of our top priorities, and one of the most effective ways we can build peace is with our Rotary Peace Fellowships, through which peace and development professionals learn how to prevent and end conflict. We offer the fellowships through our Rotary Peace Centers at leading universities around the globe, where more than 1,800 Rotary Peace Fellows have graduated. And thanks to a $15.5 million gift from the Otto and Fran Walter Foundation, we can continue supporting peacebuilders in more regions with the next peace center at Bahçeşehir University in Istanbul.

Opening another peace center is a monumental achievement, and it is my great honor to invite you to celebrate at next year's Rotary Presidential Peace Conference at the Istanbul center. The three-day conference 20-22 February will highlight the many ways our family of Rotary advances peacebuilding. Registration for the conference is officially open. I hope to see you there.

The 2025 Rotary Presidential Peace Conference has great potential for our peacebuilding efforts — but only if we have your support. The truth is, we're not going to bring peace to the world, end polio, or grow membership by waving a wand and saying some funny words. It's up to you. You create the magic with every project completed, every dollar donated, and every new member inducted.

I love my Rotary family and I know you do too. That's why I know that together, we can make every club and district simply irresistible. This year, let us change the world by embracing The Magic of Rotary.

Stephanie A. Urchick
Rotary International President

## PRESIDENTIAL THEME 2024-25
## THE MAGIC OF ROTARY

RI President-elect Stephanie Urchick celebrates the magic of Rotary. She says members create that magic with every project completed, every dollar donated, and every new member of Rotary.

**नई दिशाये, नई आशये, नया विश्वास.......**

मित्रांनो, तसे मी ३८ वर्षांपूर्वी रोटरीत आलो. मला हळु हळु जाणवले की, समाजासाठी स्वेच्छेने , समाधानाने व सेवा भावाने काम करणारी जागतिक संघटना आहे.

येथे असलेल्या फॉर वे टेस्ट ने मला प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा नव्याने मिळाली, पुढे रॉयटरीत नव नव्या जबाबदाऱ्या स्वीकारत गेलो. गरजू लोकांची जीवन जगण्याची इच्छा टिकून ठेवणारे कार्य करणे त्या सारखा दुसरा आनंद नाही. मुळातच शेतकरी कुटुंबातून व सर्व वेगवेगळया ठिकाणी परिस्थितीतून गेल्यानंतर व थोडा स्थिरावल्यानंत समाजाचे आपण देणे लागतो, हि जाणीव तीव्रतेने वाढत गेली. असेच रोटरीत कार्य करतांना एक मोठी जबाबदारी माझ्यावर आली.

प्रांत - ३१३२ च्या २४-२५ वर्षासाठी प्रांतपाल म्हणून माझी निवड झाली. आपल्या सर्वांच्या विश्वासाला पात्र ठरण्याची माझी जबाबदारी आहे. तसे हे एक प्रातिनिधिक नेतृत्व आहे, असे मी मानतो. खरे तर आपण सर्व मिळून एकत्रितपणे प्रवासाला सुरवात करीत आहोत. आता हा क्षण मोठ्या मनाने व खुल्या दिलाने स्वीकारूया. आपण हे लक्षात ठेवूया की, रोटेरियन या नात्याने आपल्यात व जगात अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याची शक्ती आहे.

नव्या **दिशेने** केलेला प्रवास व तसे बदल घडवून आणेल. आपण नियोजित केलेला सेवा प्रकल्प सोपे आहेत पण तेवढेच परिणामकारक सुद्धा आहे. आपल्याच समुदायात बदल घडवून आणण्याची संधी म्हणून बदल स्वीकारण्याचे आपणास हे आग्रहाचे आमंत्रण आहे. चला या नव्या **दिशेने** अग्रेसर होऊ यात.
आजच्या जगात जिथे आव्हाने अजिंक्य वाटतात, अनिश्चितता मोठी वाटते, तेंव्हा **आशा** एक मौल्यवान विचार कामाला येतो. मेम्बरशिप वाढण्याची **आशा** आह. फाऊंडेशनला बर्गचेस देणगी मिळण्याची आशा आहे.



**D.G. रो. डॉ. सुरेश साबू**

आपल्या नात्यातील बंधन अधिक दृढ करण्याची **आशा** आहे. चला हि नवीन आशा घट्ट धरून ठेवू. पुढे येणाऱ्या आव्हाना मध्ये तीच आपल्याला टिकवून ठेवेल.

नव्या **दिशेने** व नव्या **आशेने** पुढे जाण्यासाठी आपला स्वतःवर एकमेकांवर दृढ **विश्वास** असणे गरजेचे आहे. आपण सर्व जण मिळून अडथळयांवर मत करून आपले ध्येय साध्य करू असा विश्वास सर्वांच्या मनात असला पाहिजे. ज्याची सेवा करतो त्याचे भविष्य उज्वल करू शकतो, हा आपल्याला विश्वास आहे.
चला नव्या **दिशेने**, नव्या **आशेने** व नव्या **विश्वासाने** धाव घेऊया. एक जातीने, एकत्र वाहून मोठे स्वप्न साकार करूया. आपले समर्पण, आपली आवड व आपल्या प्रिय रोटरी मूल्याप्रती आपण सर्व वचनबद्ध होऊया व एकचितपणे नवीन प्रभावाचे वर्ष बनवूया.

आपला स्नेहांकित ,

रो. डॉ. सुरेश साबू
प्रांतपाल २४-२५
आंतरराष्ट्रीय रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२

# ASSI. DISTRICT GOVERNOR



**रो. नानिक दयालदास जोधवानी**

उत्कृष्ट नियोजन करून काम करणाऱ्या क्लबपैकी रोटरी क्लब लातूर मीडटाउन हा क्लब डिस्ट्रिक्ट 3132 मधील एक क्लब होय मागील अनेक वर्षापासून सातत्याने या क्लबला अनेक पारितोषिक मिळालेली आहेत डिस्ट्रिक्ट मध्ये नावाजलेल्या अशा या रोटरी क्लब लातूर मिड टाउन चे असिस्टंट गव्हर्नर होणे माझ्यासाठी भाग्यवान असल्याची बाब आहे. देवा चरणी प्रार्थना करतो की रोटरीचे 2024- 25 हे वर्ष खेळीमेळीच्या वातावरणात हसत खेळत पूर्ण व्हावे. रोटरी क्लब लातूर मीडटाउन चे नाव व डिस्ट्रिक्ट 3132 चे नाव

रोटरी जगतामध्ये मध्ये उत्तुंग शिखरावर पोहोचावे. सहाय्यक प्रांतपाल हा डिस्ट्रिक्ट ऑफिस व क्लब मधील दुवा असतो. प्रांतपाल रोटे डॉक्टर सुरेश साबू यांचं काम खूप प्रशंसनीय आहे. रोटरीच्या कुठल्याही कामासाठी त्यांच्यामध्ये एक वेगळी शक्ती व ऊर्जा आहे. हे आम्ही अनुभवले आहे आम्हा सर्व रोटेरियन्स साठी ते प्रेरणास्थान आहेत. मला त्यांनी त्यांच्यासोबत व त्यांच्या टीम सोबत काम करण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.

काही दिवसापूर्वी आपल्या क्लब सोबत पहिली क्लब असेंबली घेतली उपस्थित सर्व संचालकांचे वर्षभराचे नियोजन कौतुकास्पद होते. मागच्या वर्षी ग्लोबल ग्रँट झालेली आहे. दरवर्षी एक ग्लोबल ग्रँट करण्याचा मानस आहे. क्लबच्या सर्व अवेन्यू वाईज मीटिंग झालेल्या आहेत. Strtagic Planning प्रमाणे काम होणार आहे. डिस्ट्रिक्ट कडून मिळालेले गोल्स पूर्ण करण्यात कोणतीही कसर सोडणार नाही असा निर्धार नूतन अध्यक्ष रो. चेतन पंढरीकर, सचिव रो. गिरीश पेंसलवार व त्यांच्या संपूर्ण टीमचा आहे. नियोजित प्रांतपाल रो. सुधीर लातूरे या क्लबचे पहिले प्रांतपाल होणार आहेत. डिस्टिक गव्हर्नरचा क्लब असल्यामुळे क्लब मध्ये खूप उत्साह वाढला आहे. प्रामुख्याने रो. लितेश शहा, रो.उमाकांत मद्रेवार रो. अनुप देवणीकर रो. शशिकांत मोरल|वार रो. रवींद्र बनकर रोटे डॉ. राजगोपाल तापडिया, रो.डॉ. अविनाश भोसले, रो. ओमप्रकाश झुरुळे, रो. रवी जोशी, रो. दिनेश सोनी, रो. कपिल डुमणे, रो. वीरेंद्र फुंडीपल्ले, रो. योगेश काळे. रो. पवन मालपाणी, रो. डॉ. वर्धमान उदगीरकर इ. अनेक रोटेरियन्स ची रोटरी मध्ये काम करण्याची भूक आहे.

रोटरी क्लब लातूर मिडटाउन च्या संपूर्ण टीमला वर्षभर केलेल्या कामात यश प्राप्त होवो या साठी हार्दिक शुभेच्छा देतो. रो. प्रसाद वारद यांनी रोटरी दिशा हा पहिला बुलेटीन अतिशय सुंदर व सुबक प्रकाशित केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !!!

रोटरी सेवेत
रो. नानिक दयालदास जोधवानी
सहाय्यक प्रांतपाल डिस्ट्रिक्ट 3132

# PRESIDENT RIY 2024-25



**रो. चेतन पंढरीकर**

रोटरी वर्ष 2024-25 साठी माझ्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेत असताना, मी सर्व क्लब सदस्यांचे आभार मानू इच्छितो.

"Service Above Self" चे अनुकरण करत असताना, जेव्हा आपण सेवा करतो, तेव्हा ज्यांच्यासाठी / ज्यांची सेवा करतो अशा लोकांच्या जीवनावर आपल्या कायमचा ठसा उमटवतो. म्हणूनच माझा या वर्षीचा अध्यक्षीय संदेश "make your mark" असा आहे.

चला तर मग, इतरांना आपल्या क्लबमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करूया, नवीन मैत्री आणि नवीन कल्पनांसाठी दरवाजे उघडून आपली छाप पाडूया, आपला प्रभाव वाढवून आणि पूर्वीपेक्षा अधिक लोकांना सेवा देऊन आपली छाप पाडूया.

पुढील मनोगत व्यक्त करण्यापूर्वी, मी मागील अध्यक्ष रो. रवींद्र, सचिव, आणि सर्व संचालक मंडळाचे उत्कृष्ट कार्याबद्दल अभिनंदन करतो.
रोटरी इंटरनॅशनलच्या अध्यक्षा डॉ. स्टेफनी अर्चिक यांनी "The Magic of Rotary" ही थीम निवडली आहे. त्यांच्या थीमप्रमाणे, आपण एकत्र येऊन पूर्ण झालेल्या प्रत्येक प्रकल्पासह, Donate झालेल्या प्रत्येक डॉलरसह, आणि नव्याने जोडण्यात येणाऱ्या प्रत्येक सदस्यासोबत जादू निर्माण करू शकतो. त्यांची थीम आपण आपल्या क्लबमध्ये काम करत असताना आव्हान म्हणून स्वीकारूया.

सन 2024-25 मधील वाटचाल अधिक बळकट करण्यासाठी, प्रामुख्याने चार वेगळ्या धोरणात्मक प्राधान्यक्रम ठरवून घेऊयात:
- आपल्या क्लबचा प्रभाव वाढवूया.
- आपल्या क्लबची पोहोच विस्तृत करूया.
- सहभागींची प्रतिबद्धता वाढवू.
- आपली परिस्थिती सकारात्मकरीत्या सुधारूया.

अध्यक्षपदाची धुरा सांभाळत असताना, विद्यमान उपक्रम चालू ठेवत त्याचे सुदृढीकरण करणे हे उद्दिष्ट असेल. तसेच, समाजाची सेवा करत असताना भविष्यातील नवीन प्रोजेक्ट जोडून त्यासाठीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी क्लबच्या उपलब्धी आणि बदल स्वीकारण्याचे माझे ध्येय आहे. यामध्ये पर्यावरण संरक्षण, शिक्षण (कौशल्याभिमुख आणि स्वयंरोजगाराभिमुख), आरोग्य, आणि गरजू लोकांच्या मदतीसाठी कार्य करणे यांचा प्रामुख्याने समावेश असेल. हे सर्व ध्येय साध्य करण्यासाठी, आपल्यापैकी प्रत्येकजण बदल घडवून आणू शकतो. चला तर मग एकत्र बदल घडवून आणूया.

इतरांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी एकत्र काम करत असताना, वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारे Rotary Four Way Test विसरून चालणार नाही:

- Is it the TRUTH?
- Is it FAIR to all concerned?
- Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?
- Will it be BENEFICIAL to all concerned?

दहा वर्षांपूर्वी जेव्हा माझे रोटरीमध्ये पदार्पण झाले, त्या दिवसापासून आजपर्यंत अनेकांची साथ आणि मार्गदर्शन मिळाले. त्यात प्रामुख्याने माजी प्रांतपाल रो. डॉ. दीपक पोफळे, माजी अध्यक्ष रो. उमाकांत मद्रेवार, रो. सुधीरजी लातूरे, रो. डॉ. राजगोपाल तापडिया, व रो. रवी जोशी यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळाले, त्यांचे विशेष आभार.

या वर्षीचे क्लब लर्निंग फॅसिलिटेटर रो. अनुप देवनीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, मी आणि संपूर्ण संचालक मंडळ क्लबच्या प्रगतीसाठी निष्ठेने काम करणार आहोत. पुन्हा एकदा, तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याबद्दल मी कृतज्ञ आणि नम्र आहे. माझ्या कार्यकाळात आपले सहकार्य आणि समर्थन मिळावे, याची अपेक्षा आहे. आपल्या सर्वांच्या आशीर्वाद आणि मदतीनेच आपण यशस्वी होऊया. नव्या वर्षात आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

धन्यवाद!

रो. चेतन पंढरीकर
अध्यक्ष
२०२४-२५



# SECRETARY RIY 2024-25



**रो. गिरीश पेन्सलवार**

आज मी अत्यंत आनंदित आहे की आपल्यासमोर माझ्या नवीन जबाबदारींच्या संदर्भात मनोगत व्यक्त करत आहे. सेक्रेटरी म्हणून माझी निवड केल्यामुळे मला अभिमान वाटतो, आणि ही जबाबदारी स्वीकारताना मी प्रचंड उत्साह अनुभवतो.

या नवीन पदावर काम करताना, मी आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवतो. आपले कार्यक्षेत्र अधिक सुसंगत आणि परिणामकारक बनवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. माझ्या कामात पारदर्शकता, इमानदारी, आणि समर्पण हे माझे प्रमुख सिद्धांत राहतील.

माझ्या या प्रवासात मला आपल्या सर्वांच्या सल्ला, सहकार्य, आणि समर्थनाची आवश्यकता आहे. एकत्रितपणे, आपण आपल्या संस्थेच्या उद्दिष्टांना साध्य करू शकतो आणि नव्या उंचीवर घेऊन जाऊ शकतो. आपल्या सर्वांच्या सहकार्यासाठी मी नेहमीच कृतज्ञ राहीन.

सेक्रेटरी म्हणून, माझे ध्येय असेल की आपले क्लब कार्य अधिकाधिक प्रभावी आणि गतिमान बनावे. मी प्रयत्न करू की प्रत्येक सभासदाच्या आवाजाला महत्त्व मिळावे, आणि आपण सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून समाजासाठी अधिक चांगले कार्य करू शकू.

आमचे क्लब विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असतो, आणि या उपक्रमांना नवीन दिशा देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आपली सेवा अधिक प्रभावी कशी करता येईल, यावर मी नेहमीच विचार करीन.

आपल्या क्लबच्या प्रत्येक उपक्रमात माझा सक्रिय सहभाग असेल आणि मी सर्वांच्या सल्ला आणि कल्पनांना नेहमीच आदर देईन. चला, आपण एकत्रितपणे या नवीन प्रवासाची सुरुवात करू या आणि आपल्या क्लबला नव्या उंचीवर नेऊ या.

धन्यवाद!

रो. गिरीश पेन्सलवार
सचिव
२०२४-२५

# ROTARY CLUB OF LATUR MIDTOWN

## BOARD OF DIRECTORS
## 2024-25

**Rtn.Dr.Suresh Saboo**
District Governor - 2024-2025

**Rtn.Sudhir Lature**
District Governor 2025-2026

**Rtn. Nanik Jodhvani**
Assistant Governor



**Rtn.Chetan Pandharikar**
President



**Rtn.Girish Pensalwar**
Secretary




**Rtn.Anup Devnikar**
Club Learning Facillitor



**Rtn.Ravindra Bankar**
Immediate Past President



**Rtn.Amol Dadge**
President Elect



**Rtn.Ranesh Chille**
Vice President



**Rtn.Shravan Biyani**
Treasurer



**Rtn. Kapil Dumne**
Club Administration



**Rtn.Pawan Malpani**
Membership Devlopment




**Rtn. Shradhhanand Apshetti**
Public Image



**Rtn.Yogesh Kale**
Rotary Foundation




**Rtn.Motilal Varma**
New Generation



**Rtn.Santosh Gandhi**
Service Project



**Rtn.Dr.Abhijit Muglikar**
Human Devlopment



**Rtn.Dr.Avinash Bhosle**
Community Devlopment



**Rtn.Omprakash Zurule**
Vocational Services



**Rtn. Dr.Vardhaman Udgirkar**
International Services



**Rtn.Amol Banale**
IT Media



**Rtn.Avinash Alandkar**
District Emphasis



**Rtn.Kishor Datal**
RI Emphasis



**Rtn.Dr. Dinesh Soni**
Literacy



**Rtn.Prasad Warad**
Bulletin



**Rtn.Umesh Patravale**
Fellowship Chairman



**Rtn.Kalash Mundada**
Fellowship Chairman



**Rtn.Dr. Rajgopal Tapdia**
Sargent At Arm

# RTN RAVINDRA BANKAR IPP



**रो रविंद्र बनकर**

नमस्कार मित्रांनो,

सर्वप्रथम मी आपल्या सर्वांचे आभार मानू इच्छितो की आपण सर्वांनी मला आपल्या क्लबचे वर्ष 2023 -24 साठी अध्यक्ष म्हणून कार्य करायची संधी दिली. तसेच आपण सर्वांनीच या वर्षभरात अगदी सक्रियपणे सहभाग नोंदवत, अनेक समाज उपयोगी कार्य केलेले आहे.

मी आपले दोन्ही सचिव रो किशोर दाताळ व रो डॉ अविनाश भोसले यांचाही आभारी आहे, या दोघांनी सर्व मीटिंग, प्रोजेक्ट तसेच रेपोर्टिंग मध्ये आपले बहुमूल्य योगदान दिले आहे. मी स्वतःला नशीबवान समजतो की, प्रांतपाल स्वाती हेरकळ यांच्या वर्षी मला अध्यक्ष होण्याचे सौभाग्य लाभले व त्यांच्या परिवर्तन क्रांतीमध्ये खारीचा वाटा उचलता आला. स्वाती मॅडम यांचे आभार न मानता कायम त्यांचा मी ऋणी राहू इच्छितो. सहाय्यक प्रांतपाल रो विशाल जैन यांचे मार्गदर्शन, सातत्याने पाठपुरावा व मदत वर्षभर लाभली त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच, क्लब लर्निंग फॅसिलिटेटर् रो डॉ राजगोपाल तापडिया व सार्जंट रो सुधीर लातूरे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी दोघांचेही आभार मानतो.

मित्रांनो, प्रत्येक वर्षाप्रमाणे यावर्षी आपल्या क्लबला साजेस कार्य करण्यामध्ये आपण सर्वजण यशस्वी ठरलो आहोत. क्लब अडमिनिस्ट्रेशन डायरेक्टर रो डॉ राजाराम दावनकर यांच्या प्रयत्नातून 52 आठवड्यातील 53 साप्ताहिक मीटिंग असतील किंवा 12 महिन्यातील 12 मासिक संचालक मंडळाच्या बैठकी असतील, पाच क्लब असेंबली, आपल्या क्लबच्या ट्रस्टच्या 2 सहामाही मिटिंग यासोबतच स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग कमिटीची मीटिंग आपण घेण्यामध्ये यशस्वी झालेलो आहोत.

मित्रांनो, मला आणखी एका गोष्टीसाठी आपले व TRF डायरेक्टर रो डॉ किरण दंडे यांचे आभार मानायचे आहेत, यावर्षी आपण सर्वांनी मिळून तब्बल 12000 अमेरिकन डॉलर एवढा रोटरी फाउंडेशन म्हणजेच टीआरएफ जमा केलेला आहे. विशेष म्हणजे यावर्षी 57 सदस्यांनी फाउंडेशन साठी देणगी दिलेली आहे, यासोबत दोन नॉन रोटरीयन यांनी सुद्धा यामध्ये आपले सहकार्य नोंदवलेले आहे. या 57 पैकी 25% लोक असे आहेत की ज्यांनी प्रथमच टीआरएफ दिला किंवा त्यांना मागचा टीआरएफ देऊन चार ते पाच वर्षाचा कालावधी उलटून गेलेला होता. या 12000 अमेरिकन डॉलर पैकी आपण वार्षिक फाउंडेशन देणगी ही जवळपास 7500 अमेरिकन डॉलर तसेच पोलिओ फंड साठी आपण 300 डॉलरचा टप्पा पार केलेला आहे.

मित्रांनो, यावर्षी आपण फक्त देण्यात नाही तर जेवढे दिले त्याच्या अनेक पटिने फंड परत आणण्यात यशस्वी झालो आहोत. 40 वर्षाचे आपल्या क्लब चे एक अपूर्ण स्वप्न आपण ग्लोबल ग्रँट द्वारे पूर्ण केलेली आहे, आपल्याच नव्हे तर संपूर्ण लातूर जिल्ह्याचा पहिला ग्लोबल ग्रँट हराळीमध्ये एग्रीकल्चर इक्विपमेंट बँक याद्वारे करण्यात आपण यशस्वी झालेलो आहोत, यासाठी प्रकल्प प्रमुख DGN सुधीर लातूरे यांनी अतिशय परिश्रम घेतले, या ग्रँट साठी प्रांतपाल स्वाती यांचे सहकार्य आपण कधीही विसरू शकणार नाहीत. अमेरिकेतील रोटरी क्लब ऑफ इम्मुअस यांच्या सहकार्यातून तब्बल 35 हजार अमेरिकन डॉलरची ही ग्रँट आहे. या ग्रँट साठी सिंहाचा वाटा उचलणारे माझे अमेरिका येथील मित्र रो संजय देशपांडे यांचेही मी आभार मानतो.

या वर्षी आपल्या क्लबला रोटरी इंटरनॅशनल/ डिस्ट्रिक्ट कडून आतापर्यंत
- ग्लोबल ग्रँट स्वरूपात $३५००० म्हणजेच अंदाजे ₹२८,७०,०००/-
- CSR ग्रांटच्या माध्यमातून ३० लोखंडी कपाटे अंदाजे ₹२,४०,०००
- डिस्ट्रिक्ट ग्रँट मार्फत ६ आटा चक्की ₹९३,०००
- दुसरा CSR मार्फत रोटरी सायकल बँक साठी २० सायकल ₹१,१०,०००
- म्हणजेच अंदाजे ₹३३ लाख रुपयाचा निधी उपलब्ध झाला आहे
- दुसरा $६१,००० चा ग्रँट म्हणजेच ₹ ५०,६३,०००/- ज्या मधून विवेकानंद हॉस्पिटल येथे कॅन्सर स्क्रिनिंग बस उभारली जाणार आहे व ज्यात आपण को होस्ट आहोत, ही मंजुर झाली आहे
म्हणजेच 12000 अमेरिकन डॉलर देत आपण जवळपास 1,13,000 अमेरिकन डॉलर येवढा फंड आपल्याकडे वळवण्यात यशस्वी झालो आहोत.

रो विशाल आयाचीत यांच्या मेंबरशिप कमिटीने अतिशय सुंदर कार्य करत यावर्षी तब्बल 23 सदस्य वाढ केलेली आहे, 107 संख्येवरून जुलै मध्ये सुरुवात केली व 130 एवढ्या सदस्य संख्येवर आपण जुन अखेरीस आलेलो आहोत. कोषाध्यक्ष रो डॉ श्रीनिवास भंडे यांचे विशेष योगदान सुद्धा सुरवातीला तसेच शेवटी फिस जमा करून घेण्यात मिळाले त्याबद्दल त्यांचेही आभार.

मित्रांनो, आपल्या सर्व सक्रिय संचालक मंडळाच्या कार्यामुळे ज्यात, जनसमुदाय विकास संचालक रो कलश मुंदडा, साक्षरता संचालक रो ओमप्रकाश झूरुळे, आय टी मीडिया संचालक रो श्रवण बियाणी, पोलिओ संचालक रो डॉ वर्धमान उदगीरकर, परिवर्तन प्रकल्प संचालक रो अमोल दाडगे, मनुष्य विकास संचालक रो मोतीलाल वर्मा, व्यावसायिक संचालक रो पवन मालपाणी, DEI संचालक रो मन्मथ अप्पा पंचाक्षरी, WINS संचालक रो सोनु डगवाले, पर्यावरण संचालक रो शिरीष उटगे, इंटरनॅशनल सर्व्हिस संचालक रो डॉ दिनेश सोनी, महिला सक्षमीकारण संचालक रो उमा व्यास यांच्या प्रयत्नातून सर्वच अवेनु मध्ये अगदी जोरदार कार्य करत जवळपास शंभर किंवा जास्त प्रकल्प आपण घेतले आहेत, यामध्ये प्रामुख्याने कोणताही प्रकल्प छोट्या स्वरूपाचा नसावा व तो आपल्या क्लबला साजेसा असावा याची आपण दखल या सर्वांनी घेतलेली आहे. सोबतच ग्लोबल ग्रांट असेल डिस्ट्रिक्ट ग्रँड असेल किंवा प्रथमच झालेले दोन सी एसआर प्रोजेक्ट असतील.
या सर्व प्रकल्पाची सविस्तर माहिती सचिव रो डॉ अविनाश भोसले व रो किशोर यांनी दिलीच आहे.

आपल्या सर्व माजी अध्यक्ष यांच्या सहकार्याने विशेषतः IPP रो विरेंद्र फुंडीपल्ले यांच्या प्रयत्नातून आपण यावर्षी आपल्या क्लब साठी प्रॉपर्टीच्या स्वरूपामध्ये एक प्लॉट घेण्यात यशस्वी झालेलो आहोत नुकतेच या प्लॉटला फेन्सिंग करत ग्रामपंचायत मध्ये आपण याची नोंद करण्याची प्रक्रियाही पूर्ण करत आहोत. माजी अध्यक्ष रो CA राजगोपाल सारडा यांच्या प्रयत्नातून यावर्षी आपल्या क्लब ट्रस्टला 80G सर्टिफिकेट सुद्धा प्राप्त झाले आहे.

माजी अध्यक्ष रो शशिकांत मोरलावार यांच्या सहकार्याने, यावर्षी आपण आपला पर्मनंट प्रोजेक्ट रोटरी अन्नपूर्णा योजना हा अगदी यशस्वीरित्या सुरू ठेवला आहे, यासाठी फंड राईज स्वरूपामध्ये आपण घेतलेले मराठी नाटक घेण्याचा निर्णय अगदी यशस्वी ठरला आहे.
रो जगदीश कुलकर्णी व त्यांच्या पब्लिक इमेज टीमच्या उत्कृष्ट कार्यामुळे, आपले सर्व कार्य डिस्ट्रिक्ट तसेच रोटरी विश्वात पोचवण्यात सुध्दा आपण यशस्वी झालो आहोत. जवळपास सर्व प्रकल्पा बाबतच्या बातम्या, जवळपास सर्वच स्थानिक वृत्त पत्रात झळकल्या आहेत, सोशल मीडिया मध्ये ट्रेण्डही झाल्या आहेत,

युथ सर्व्हिस संचालक रो प्रसाद वारद यांच्या प्रयत्नातून यावर्षी दोन कम्युनिटी बेस इंटरॅक्ट क्लब आपण स्थापित केलेले आहेत आणि मला सांगण्यास आनंद वाटतो की हे दोन्ही इंट्रॅक्ट अतिशय सक्रियपणे कार्य करत आहेत या सोबतच मागील एक रोटरक्ट व एक इंट्रॅक्टर आपण अतिशय सक्रिय ठेवण्यामध्येही यश मिळवलेल आहे. या चारही क्लबचे पुढील अध्यक्ष व सचिव निवड झाले आहेत. युथ सर्व्हिसच्या कार्यात रोटरॅक्ट अध्यक्ष रोट. डॉ अदिती दर्डा व सचिव रोट मीत दामा यांची बहुमोल अशी मदत मला झाली आहे. मागील दोन वर्षापासून आपण बोकनगाव मध्ये कार्य करत होतो, याचे आपण आता परिवर्तन ग्राम आरसीसी मध्ये रूपांतर केलेला आहे आणि अगदी जोरदार कार्यक्रम या आरसीसी मध्ये सुद्धा आपण घेतलेले आहेत, यासाठी सचिव रो किशोर दाताळ यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

नक्षत्र रोटरी कॉन्फरन्स जी अंबी व्हॅली येथे पार पडली यासाठी तब्बल 76 सदस्य व त्यांची कुटुंबीयांनी सहभाग घेतला, कमीत कमी 20 ते 22 लाख एवढी या कॉन्फरन्सद्वारे आपण डिस्ट्रिक्टला मदत करू शकलो, फक्त कॉन्फरन्सच नाही तर जे डिस्ट्रिक्टचे वेगवेगळे लर्निंग सेमिनार होते त्यामध्येही मोठ्या संख्येने आपले सदस्य उपस्थित होते जसे की असेंबलीसाठी 23 मेंबरशिप सेमिनारसाठी 16, DTTS साठी 5 व इतर सर्व डिस्ट्रिक्ट इव्हेंट साठी पुरेपूर उपस्थिति होती. येणाऱ्या डिस्ट्रिक्ट टीमला सुद्धा पुरेपूर सहकार्य करत, लातूर मध्येच, एकलव्य हे एक नेत्रदीपक PETS SETS, आपल्या क्लबची ही पहिलीच वेळ असूनही एकजुटीने आपण घेण्यात यशस्वी झालो आहोत. हे सर्व करत असताना अनेक कार्य करायचे राहूनही गेल असेल पण मला विश्वास आहे की आपण सर्वजण आपल्या येणाऱ्या टीमला असेच सहकार्य करत या राहिलेल्या गोष्टी सुद्धा पूर्ण करत क्लबला भविष्यात आणखी एका मोठ्या उंचीवर घेऊन जाऊ. वर्षभरात डिस्ट्रिक्ट लर्निंग फॅसिलिटेटर् माजी प्रांतपाल डॉ दिपक पोफळे, DG ऑफिस मधून रो प्रमोद शिंदे, रो सोनाली शिंदे, रो दिपक बागडे तसेच सर्व डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर यांचेही त्यांच्या सहकार्य व मार्गदर्शना बद्दल आभार.

आपल्या सर्वांच्या कार्याला प्रभावित होत चालु वर्षाचे प्रांतपाल डॉ सुरेश साबू यांनी माझ्यावर विश्वास दाखवत या वर्षी डिस्ट्रिक्ट डायरेक्टर पब्लिक इमेजची जवाबदारी दिली याबाबत त्यांचेही आभार.

परत एक वेळा आपल्या सर्वांचे, सर्व सहकार्याबद्दल अंतकरणातून आभार

रो रविंद्र बनकर
अध्यक्ष 2023-24
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊ

# RTN AVINASH BHOSALE
# SECRETARY 2023-24



**रो. डॉ. अविनाश भोसले**

सर्वप्रथम मी अध्यक्ष रो. रविंद्र बनकर व सर्व पास्ट प्रेसिडेंट यांचे धन्यवाद मानू इच्छितो. त्यांनी माझी सचिव पदी नियुक्ती करून मला काम करण्याची संधी दिली.

1. रक्त दान श्रेष्ठ दान – दि. 1 जुलै 2023 वर्षाची सुरवात डॉक्टर्स डे निमित्ताने रक्तदान संकलनाने झाली. या साठी लातूर अजिंक्यनस्, माहेश्वरी समाज व अग्रेसन समाज यांच्या सहकार्याने 3 शिबीरातून 367 Bags रक्त गोळा करण्यात आले. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. प्रमोद कुंभार, रो. श्रीप्रकाश बियाणी व रो. चंद्रकांत अग्रवाल यांनी खूप मेहनत घेतली.

2. परिवर्तन प्रकल्प सृष्टि – या प्रकल्पांतर्गत संभाजी महविद्यालय मुरुड, विलासराव देशमुख फांऊडेशन, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, लोकमान्य टिळक विद्यालय पोखरी, वसंतराव नाईक विद्यालय काटगाव आणि परिवर्तन ग्राम बोकनगाव येथे 501 दूर्मिळ झाडे लावण्यात आली. प्रकल्प प्रमुख म्हणून रो. विशाल आयचित यांनी काम पाहिले.

3. Maternal and Child Health या विषयावर व्याख्यान – दि. 8 जुलै 2023 रोजी क्लब सदस्य व इतर नागरिकांसाठी स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुरेखा काळे यांचे Maternal and Child Health या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

4. क्लबचा 40 वा पदग्रहण समारंभ – दि. 16 जुलै 2023 रोजी क्लबचा 40 वा पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यामध्ये RCC चार्टर Presentation, बुलेटीनचे प्रकाशन करण्यात आले. तसेच क्लब सदस्य आणि उपस्थित नागरिक असे एकूण 220 जणांनी स्त्री जन्माचे स्वागत, भ्रूण हत्त्या होऊ देणार नाही, हुंडा घेणार नाही व देणार नाही याची शपथ घेतली. ही शपथ रो. मन्मथअप्पा पंचाक्षरी यांनी दिली. यामध्ये P.D.G. महेश मोकलकर, D.G.N. सुधिर लातूरे यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले, ज्यामुळे आम्हाला एक नवीन ऊर्जा प्राप्त झाली.

5. साक्षर विद्या – प्रोजेक्ट साक्षर विद्या अंतर्गत महानगरपालिका शाळेतील इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या 17 शाळेतील 1000 विद्यार्थ्यांना डिक्शनरीचे वाटप विद्याभारती प्रकाशन लातूर यांच्या सहकार्याने करण्यात आले. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. यश कुलकर्णी यांनी काम पाहिले.

6. मुलींसाठी स्वच्छ व शीतल पेय जल – वैश्य प्रतिष्ठाण लातूरच्या मुलींच्या वसतिगृहासाठी R.O. System बसविण्यात आली. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. उमेश पत्रावळे यांनी काम पाहिले.

7. 4 way test चे स्टिकर – पब्लिक इमेज व Vocational Services अंतर्गत 4 way test चे 5000 स्टिकर्स छापून त्याचे वाटप करण्यात आले. याचे काम प्रकल्प प्रमुख म्हणून रो. पवन मालपाणी यांनी पाहिले.

8. Physical and Mental Health Counsoling for the Students – हा प्रकल्प Pediatric Association of India यांच्या सोबत श्री देशीकेंद्र विद्यालय येथे घेण्यात आला. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. डॉ. वर्धमान उदगीरकर यांनी काम पाहिले.

9. पशुपान व दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण – RCC बोकनगाव येथे पशुपालन व दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण दि. 10 सप्टेंबर 2023 ते 16 सप्टेंबर 2023 या सप्ताहात घेण्यात आले. याचा 262 शेतकरी बांधवांना फायदा झाला. शेवटच्या दिवशी सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले. प्रकल्प प्रमुख म्हणून सचिव रो. किशोर दाताळ यानी खूप मेहनत घेतली.

10. Nation Builder Award 2023-24 – दि. 24 सप्टेंबर 2023 रोजी STEAM Education येथे National Builder Award 2023-24 हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये 8 शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. जगदिश कुलकर्णी यांनी काम पाहिले.

11. अन्नपूर्णा प्रोजेक्ट – परमनंट प्रोजेक्ट रोटरी अन्नपूर्णा यांच्या मार्फत दररोज 54 आजी-आजोबांना दोन वेळेस पुरेल एवढा जेवणाचा डबा दिला जातो. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून P.P. रो. शशीकांत मोरलावर काम पाहत आहेत.

12. वेगवेगळे Projects – Interact Club सोबत Wall Painting, Environment Friendly Diwali, Mathematic Day असे Projects घेण्यात आले. याचे Project Chairman रो. रोहीत कुलकर्णी हे होते.

13. World Heart Day – या निमित्त सर्व रोटरी परिवार लातूर एकत्र येऊन लातूरकरांसाठी हृदय संवाद हा कार्यक्रम आयोजित केला. यामध्ये हृदय तज्ञ रो. डॉ. संजय शिवपुजे व डॉ. श्रिरंग रानडे (पुणे) यांनी हृदयासंबंधि बहुमोल मार्गदर्शन केले.

14. मेगा चित्रकला स्पर्धा – इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी व दिव्यांगासाठी मेगा चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये 120 शोळेमधून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक वर्गातून पहिले बक्षिस सायकल व 5 व्या क्रमांकापर्यंतचे बक्षिस देण्यात आले. यामुळे रोटरीची Public Image संपूर्ण शहरात निर्माण झाली. याचे Project Chairman म्हणून रो. चेतन पंढरीकर व रो. अमोल दाडगे यांनी काम पाहिले.

15. Polio and Dengue Awareness – Polio Day निमित्त डॉ. उदगीरकर यांनी Polio and Dengue संदर्भात 500 हून अधिक लोकांना Prevention and Treatment बद्दल माहिती दिली.

16. मेगा Health चेकअप कँप – गंजगोलाई देवस्थान यांच्या सोबत मेगा Health चेकअप कँप घेण्यात आला. यामध्ये Oral Cancer Detection, Dental Checkup, Ophthalmic Diagnosis, Stroke, Pediatric Diagnosis करण्यात आले. याचे Project Chairman म्हणून रो. मन्मथ पंचाक्षरी यांनी काम पाहिले.

17. साड्या वाटप कार्यक्रम – रोटरी अन्नपूर्णा महिला लाभार्थी व इतर काही गरजू महिलांना रो. विशाल आयाचित यांच्या मातोश्रीच्या स्मरणार्थ साड्या वापट करण्यात आल्या.

18. ड्रेस वाटप कार्यक्रम – रोटरी अन्नपूर्णा तर्फे 15 पुरूष लाभार्थिंना ड्रेस वाटप करण्यात आले. याचे Project Chairman रो. श्रिप्रकाश बियाणी हे होते.

19. दिवाळी निमित्त फराळ वाटप – रोटरी अन्नपूर्णाच्या एकूण 55 लाभार्थिंना दिवाळी निमित्त फराळ वाटप करण्यात आले. याचे Project Chairman म्हणून रो. चंद्रप्रभू जंगमे यांनी काम पाहिले.
20. शीत शवपेटी – रूग्ण आधार सेवा केंद्र यांना रो. दमोदर मुंदडा आणि रो. डॉ. दिनेश सोनी यांच्याकडून शीत शवपेटी देण्यात आली.

21. रोटरी आधार पेशंट केअर सेंटर – याची सुरूवात लातूर रोटरी परिवारामार्फत करण्यात आली. यामध्ये गरू रुग्णांना कमीत कमी खर्चामध्ये लागणारे मेडीकल साहीत्य उपलब्ध केल जाते. या सेंटरसाठी आमच्या क्लब मार्फत शीत शवपेटी, Oxygen Concentrator Machine, Fowler Bed इत्यादि साहीत्य देण्यात आले.

22. अन्नपूर्णा योजना 4 था वर्धापन दिन – रोटरी अन्नपूर्णा योजनेचा 4 था वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याच दिवशी अन्नपूर्णा Fund Raise व Public Image साठी एक नाटक घेण्यात आले. यातून Rs. 183100/- इतका Fund Raise करण्यात आला. या प्रॉजेक्टचे Project Chairman म्हणून रो. अमोल बनाळे यांनी काम पाहिले.

23. स्वेटर्स भेट – रो. मोतीलाल वर्मा यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थ्यांना 55 स्वेटर्स भेट देण्यात आले.

24. Two Months Environmental RYLA for Girls – याची सुरूवात श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय येथे झाली. दोन महिने हा RYLA चालला. याचे Project Chairman म्हणून रो. किरण दंडे यांनी काम पाहिले. सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले तसेच या ठिकाणी 50 औषधी झाडे लावण्यात आली.

25. प्रयोगशाळा साहीत्य वाटप – गणेश विद्यालयामध्ये प्रयोगशाळा साहीत्य वाटप करण्यात आले.

26. Interact Club of Latur Sports Football Leage Match – दि. 1 मे 2024 रोजी घेण्यात आली. या स्पर्धेसाठी 6 टीम सहभागी झाल्या.

27. Rotary Excellence Award – उत्कृष्ट सेवा व्यवसाय पुरस्कार दि. 4 फेब्रुवारी 2024 रोजी प्रांतपाल रो. स्वाती हेरकल यांच्या हस्ते उत्कृष्ट व्यवसायिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. पवन मालपाणी यांना काम पाहिले.

28. दूध भेसळ चाचणी कँप – आर.टी.पी.सी.आर. अंतर्गत दूध भेसळ चाचणी कँप घेण्यात आला. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. डॉ. किरण दंडे यांनी काम पाहिले.

29. आस्था मार्फत प्रशिक्षण – आस्था अंतर्गत मासिक पाळीवर अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. याचे प्रकल्प प्रमुख रो. प्रशांत भातगावे हे होते.

30. वाढदिवस सिलेब्रेशन – सर्व सदस्यांचे वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यात आले.

31. आटा चक्की वाटप – रोटरी की आशा डिस्ट्रिक्ट ग्रँट प्रांतपाल स्वाती हेरकल यांच्या संकल्पनेतून गरजू महिलांना स्वावलंब बनविण्साठी व्यवसायिक 18 आटा चक्कीचे वाटप लातूर रोटरी परिवाराच्या माध्यमातून पार पडले.

32. Rubix Cube Tournament - Interact Club of Young Achievers यांनी दि. 23 जून 2024 रोजी घेतला.

33. सॅनेटरी पॅड डिस्पोजेबल मशीन इंस्टॉलेशन – दि. 27 जून 2024 रोजी महिला तंत्रनिकेतन महाविद्यालय लातूर येथील मुलींच्या वसतिगृहात 3 सॅनिटेरी पॅड डिस्पोजेबल मशीन बसविण्यात आल्या. याचे प्रकल्प प्रमुख रो. विशाल आयचित हे होते.

34. दि. 28 जून 2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयास मुलींसाठी एक (1) सॅनिटरी पॅड डिस्पोजेबल मशीन देण्यात आली. याचे प्रकल्प प्रमुख रो. विशाल आयचित हे होते.

35. दि. 28 जून 2024 रोजी मुरूड येथे बालाजी देवस्थानास शीत शवपेटी देण्यात आली. याचे प्रकल्प प्रमुख रो. विशाल आयचित हे होते.

36. धनेवगाव येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी लवकरच R.O. Water Plant बसविण्यात येणार आहे. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. ओमप्रकाश झुरूळे कम पाहत आहेत.

अध्यक्ष रो. रविंद्र बनकर, सचिव रो. किशोर दाताळ, सर्व पास्ट प्रिसिडेंट, सर्व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व सर्व सभासदांनी मार्गदर्शन व सहकार्य केल्यामुळेच हे सर्व प्रोजेक्ट यशस्विपणे पूर्ण करता आले. याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

सचिव
रो. डॉ. अविनाश भोसले

# RTN KISHOR DATAL
# SECRETARY 2023-24



**रो. किशोर दाताळ**

नमस्कार मित्रांनो...

मी सर्वप्रथम आपण सर्वांचे, क्लब चे आणि अध्यक्ष यांचे मनापासून आभार मानू इच्छितो, कारण त्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आणि क्लबच्या सचिव पदाची जवाबदारी माझ्यावर आणि रो. डॉ. अविनाश भोसले सर यांच्या वर सोपवली. नक्कीच आम्ही आमच्या कामावर समाधानी आहोत कारण दिलेली जवाबदारी १००% नाही पण त्याच्या जवळपास तरी नक्की यशस्वी रित्या पार पाडली असे आम्हास वाटते. वर्ष सुरू होताना मनात धुक धुक तर होतीच परंतु अध्यक्ष रो. रवींद्र बनकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि सहज रित्या काम, Reporting करून घेतले आणि हे वर्ष कसे गेले ते समजलेच नाही. काम करताना अध्यक्ष यांनी आम्हा दोन्ही सचिवांना कामाचे स्वरूप समजावून सांगितले आणि जवाबदारी वाटून दिली, यामुळे काम करणे अधिक सोयीस्कर झाले. यामध्ये माझ्याकडे ...

Online Meeting Reporting - या वर्षी झालेल्या सर्वच्या सर्व साप्ताहिक मीटिंग, संचालक मीटिंग, ट्रस्ट मीटिंगची तसेच सर्व प्रकल्पाचे ऑनलाईन rotary India वर Reporting त्या त्या वेळेस अजेंडा आणि मीटिंगचे minutes upload करून करण्यात आली आहे. Rotary.org तसेच Rotary India या दोन्ही ठिकाणी reporting झाले आहे. या वर्षी आपण १०० पेक्ष्या जास्त प्रोजेक्ट्स घेतले आणि सर्वच्या सर्व प्रोजेक्ट्स ची reporting त्या त्या वेळेस वेळेवर करण्यात आली.

क्लब मार्फत घेण्यात आलेल्या प्रकल्पाची माहिती, भोसले सर देत आहेत तर इतर प्रकल्पांची माहिती खालील प्रमाणे आहे. -


ग्लोबल ग्रँट - यावर्षी ४ फेब २०२४ रोजी अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हराळी तालुका लोहारा जिल्हा धाराशिव येथे आपला ग्लोबल ग्रँट " Agricultural Equipment Bank" याचे DG स्वाती हेरकळ यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याचे प्रायमरी संपर्क रो सुधीर लातूरे तर प्रोजेक्ट चैर्मन म्हणून रो. अमोल दाडगे यांनी काम पाहिले.

CSR, District Grant - यावर्षी झालेल्या पहिल्या CSR Grant "रोटरी की पाठशाळा" या प्रकल्पाचे उद्घाटन करण्याचा मान आपल्या क्लब ला मिळाला आणि ४ फेब २०२४ रोजी याचे उद्घाटन मोठ्या दिमाखात करण्यात आले. आणि १३ फेब २०२४ रोजी या प्रकल्पअंतर्गत आपल्याला मिळालेल्या ४० शाळांना लोखंडी कपाट आणि पुस्तके यांचे वाटप करण्यात आले. या प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख म्हणून रो. विजयकुमार बिराजदार यांनी काम पाहिले.

District Grant - एकल महिलांसाठी आटा चक्की या प्रकल्पांतर्गत district कडून आपल्याला ६ आटा चक्की मिळाल्या आणि यापैकी ५ आटा चक्की एकल महिलांना आणि एक गुवांतीबेन सेवाभावी संस्था यांना २३ जून २०२४ रोजी रोटरी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात वाटप करण्यात आले.यासाठी प्रोजेक्ट चैरमन म्हणून रो विशाल अयाचीत यांनी कार्य पाहिले.
या शिवाय आणखीन एका CSR Grant मार्फत २० सायकली मंजूर झाल्या असून लवकरच १० सारोळा येथील शाळा आणि १० काटगाव येथील शाळेसाठी देण्यात येणार आहेत.

अश्या पद्धतीने आम्ही सर्व meetings, projects, events यांची ऑनलाईन reporting अगदी वेळेवर केली आहे.  परत एकदा अध्यक्ष रवींद्र बनकर, सचिव रो. अविनाश भोसले, BOD, Club आणि सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि या नवीन president, secretary आणि BOD ला माझ्या शुभेच्छा देतो.

धन्यवाद,
रो. किशोर दाताळ
सचिव २३-२४



# "माता व बालसंगोपन"



**रो. राजगोपाल तापडिया**

रोटरी मित्रांनो ,नमस्कार,🙏

आपणास माहीतच आहे की रोटरी इंटरनॅशनल ने सुनिश्चित केलेला आपल्या सात फोकस एरिया मध्ये "माता व बालसंगोपन" हा एक एरिया आहे. रोटरीने आपल्या कार्याच्या माध्यमातून आई व बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे.

या फोकस एरिया चा उद्देश आई व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करून, त्याचे आरोग्य उत्तम राहावे. त्याच सोबत त्यांना उत्कृष्ट जगण्याच्या दर्जा प्राप्त करून देण्यासाठी कटिबद्ध असावे. रोटरी इंटरनॅशनच्या माध्यमातून या विषयावर जगभर कार्य दररोज चालू असते. रोटरी ने एक एक महिना एका एका कार्यासाठी निश्चित केलेला आहे. तसेच हा जुलै महिना "महिला व बालसंगोपन" या विषयासाठी वाहिलेला आहे. या फोकस एरियामध्ये आपण क्लब लेवल वर छोटे छोटे प्रकल्पा द्वारे कार्य करणे तसेच रोटरी इंटर्नॅशनल च्या सहकार्याने या फोकस एरिया मध्ये मोठे कार्य करणे हे ही अपेक्षित आहे.

आपण काय करू शकतो......

१. मातेच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न -

बाळंतपणामध्ये अथवा इतर व्याधीचा परिणामी मातांच्या मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे. ते कमी करण्यासाठी आपण आपल्या शहरात उत्कृष्ट आरोग्य सेवेची उपलब्धी करून देणे आवश्यक आहे. प्रचलित आरोग्य सेवेतील त्रुटी शोधून ती दूर करण्यासाठी शाश्वत, दूरगामी व निरंतर चांगल्या संधी निर्माण केल्या पाहिजे या गोष्टीची गरज ग्रामीण व दुर्गम भागात अधिक आहे.

२. बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी घेतलेली विशेष खबरदारी -

बालकांची प्रतिकारक क्षमता पूर्णतः वाढ होई पर्यंत त्याच्या समतोल व पोषण मूल्याधारीत आहाराची गरज लक्षात घेऊन, बालकांची सर्वांगीण वाढ व विकास होण्यासाठीची आपण विशेष प्रयत्न केले पाहिजे. बालकांच्या आरोग्य सेवेत त्रुटी दूर करून योग्य उपचार व अत्याधुनिक सेवा पुरवने गरजेचे आहे. लसीकरणाची व्याप्ती वाढविणे, त्याची पूर्णतः अंमलबजावणी व्हावी या साठी अधिकचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. व्याधी झाल्यावर त्याच्यावर उपचार करण्यापेक्षा आजार होऊच नये म्हणून घेतलेली खबरदारी जास्त महत्वाची असते. रोटरी इंटरनॅशनललाही व्याधी येऊच नये म्हणून केलेलं प्रयत्न जास्त महत्वाचे वाटतात.



MATERNAL HEALTH AND CHILD CARE
ROTARY'S AREAS OF FOCUS

३. लोकजागृती साठी प्रयत्न करणे -

आरोग्याच्या शिक्षणासाठी वर्तमानपत्राद्वारे, समाज माध्यमातून, प्रबोधनपर चर्चासत्रे घेऊन आणि भिंतीपत्रके, पथनाट्य, आरोग्य शिबीरे, माहिती पुस्तिका इत्यादी माध्यमातून बालकांच्या व मातांच्या आरोग्यावर चर्चा करून लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रोटरी अधिक प्रयत्नशाली असते.

४. ईतर बाबीद्वारे ....शासनाच्या आरोग्यसेवेला, खाजगी रुग्णालयातून, तेथील कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक माहिती व उपचाराचे प्रशिक्षण देणे, तेथील यंत्रसामुग्री अद्ययावत व सुसज ठेवणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविणे, मोबाईल क्लिनिकची सुविधा चालू करणे अश्या पद्धतीने एन. जी. ओ. व इतर संस्था सोबत सहयोग ठेवून प्रबोधनाचे कार्य चालू ठेवता येते. स्वच्छेतेच्या अभावामुळे व अशुद्ध पाणी, अशुद्ध हवा, भेसळ केलेलं अन्नपदार्थ यांचा हि खूप मोठा प्रभाव माता व बालक यांच्या आरोग्यावर होत असतो तेव्हा स्वच्छता व शुद्धजल या बाबतीत हि रोटरी द्वारा कार्य खूप मोठ्या प्रमाणात होत असते. असे मूलभूत कार्य रोटरीला अपेक्षित असते. बाळांतपणानंतर आईने किमान एक वर्ष तरी आपल्या अंगावरचे दूध बाळाला पाजले पाहिजे हे माता व बाळ या दोघांच्या आरोग्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. "स्तन्यपान सप्ताह" अश्या कार्यक्रमाचे आयोजन करून या बाबतीत जागृती करण्यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे. प्रसूती शक्य तो चांगल्या दवाखान्यात तज्ञ मंडळींच्या देखरेखीखाली होणे अपेक्षित आहे. शक्य असल्या ठिकाणी प्रसूती दवाखान्यात व्हावी यासाठी अधिकचे प्रयत्न करणे गरजेचे असते. जेथे वैद्यकीय सेवा अपुरी पडते अध्या दुर्गम भागात प्रसूतीसाठी मदत करण्यासाठी "दायी" चे प्रशिक्षण वर्ग घेणे उपयुक्त ठरेल.

स्त्रियांमध्ये होणाऱ्या कॅन्सर चे वाढते प्रमाण लक्षात घेता स्तनाचे कँसर, गर्भाशयाचे कँसर, गर्भाशय मुखाचे कॅन्सर व स्त्री बीजांड कोष चे कॅन्सर या करीता लवकर निदान होऊन त्वरित चांगले उपचार मिळण्यासाठी कॅन्सर डिटेक्शन मोबाईल व्हॅन व त्यामध्ये अद्ययावत यंत्रसामुग्री व तज्ञ व्यक्तींचा सहभाग या बाबी उपलब्ध करून देण्यासाठी रोटरी फौंडेशन ची मदत आपणास नक्की घेता येईल.

स्त्रियांच्या व बालकांच्या मानसिक आरोग्य चांगले राहण्यासासाठी समुपदेशन केंद्र सुरु करणे हे हि एक उत्तम कार्य रोटरीच्या माध्यमातून आपण करू शकतो. त्याच सोबत योग, प्राणायाम व ध्यान धारणेच्या माध्यमातून जास्तीत जास्त मानसिक व शारीरिक आरोग्य निरोगी ठेवण्याची साठी प्रयत्न जास्त उपयुक्त ठरतात.

धन्यवाद.

रो. राजगोपाल तापडिया
पास्ट प्रेसिडेंट , सार्जेंट अँट आर्मस,
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन,रो. प्रांत ३१३२







# “पदग्रहण सोहळा”




**"रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन चा 41 वा पदग्रहण सोहळा"**

हा समारंभ 7 जुलै 2024 रोजी उद्योग मित्र फंक्शन हॉल, लातूर येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या महत्वपूर्ण प्रसंगी मान्यवर PDG दिपक पोफळे, DGN जयेश पटेल, DGE सुधीर लतुरे, DRR रोहित चव्हाण आणि AG नानिक जोध्वानी यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीने या समारंभाचे महत्व अधिकच वाढले.

रो चेतन पांढरकर यांना अध्यक्षपदाची आणि रो गिरीश पेंसलवार यांना सचिवपदाची सूत्रे सुपूर्द करण्यात आली. याशिवाय, 2024-25 वर्षासाठी नवीन संचालक मंडळाची नियुक्ती करण्यात आली. वर्ष २०२३-२४ चा रोटरी मधील सर्वात मानाचा पुरस्कार "SERVICE ABOVE SELF" हा PDG दिपक पोफळे यांना मिळाला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

रोटरी क्लब  ऑफ लातूर मिडटाऊन शी संलग्न असलेली खालील क्लब्सचेही नवीन कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात आली:

रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाउन
इंटरेक्ट क्लब ऑफ यंग अचिव्हर्स
इंटरेक्ट क्लब ऑफ लातूर स्पोर्ट्स
इंटरेक्ट क्लब ऑफ श्री गणेश विद्यालय

# JULY PROJECTS





Tree Plantation at Club Property







Blood Donation on Doctors Day





CA & Doctors Felicitation on 1st July





Donation of RO Water Filter & Dispenser at School

# Meetings July



















# HAPPY BIRTHDAY

## August Birthdays

| | |
|---|---|
| RTN. UMAKANT UTTAMRAO MADREWAR | 2-AUG |
| RTN. SHRINIVAS UMAKANT PENSALWAR | 4-AUG |
| RTN. VAIBHAV PRAFULL SHAHA | 4-AUG |
| RTN. JAY PRAKASH SHRI KISHAN SONI | 8-AUG |
| RTN. PRAMOD KUMBHAR | 10-AUG |
| RTN. HARISH RADHAKISHAN KATARIYA | 15-AUG |
| RTN. KISHOR DATAL | 15-AUG |
| RTN. GANESH DYANOBA SAWANT | 15-AUG |
| MRS. RACHNA PAWAN MALPANI | 16-AUG |
| RTN. SUNIL AASARAM PARANDEKAR | 18-AUG |

| | |
|---|---|
| RTN. AMOL BABURAO DADGE | 25-AUG |
| RTN. CHANDRAKANT GASTGAR | 26-AUG |
| MRS. SANGITA UDAY DESHPANDE | 26-AUG |
| MRS. RAKHI KAPIL POKARNA | 27-AUG |
| RTN. RAVI BHANUDAS JOSHI | 30-AUG |
| MRS. SAPNA RAJGOPAL SARDA | 30-AUG |
| MRS. SURYAVANSHI JANHAVI MANOJ | 30-AUG |
| MRS. UMA RAJESH DAYAMA | 30-AUG |
| RTN. ROHIT KULKARNI | 31-AUG |
| MRS SEEMA BALAPRASAD AGROYA | 31-AUG |







July - Wedding Anniversary Celebration